दिनांक २७/१०/२०२३

# प्रसिध्दी पत्रक

**श्री. महेंद्र भालचंद्र चौधरी, वय 50 वर्षे, पद- लेखा अधिकारी, वर्ग- 2, जिल्हा अधिक्षक,कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये 4000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगरच्या जाळयात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे उस्मानपुरा,छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | श्री. महेंद्र भालचंद्र चौधरी, वय 50 वर्षे, पद- लेखा अधिकारी, वर्ग- 2, जिल्हा अधिक्षक,कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. द्वारा प्लॉट नं. 20 संतोष सोनी, शांतीनाथ हौसिंग सोसायटी, गादीया विहार छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 4000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | 4000/-रुपये |
| तपास अधिकारी | श्रीमती संगीता पाटील, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांनी कार्यालयात केलेल्या कामाचे बील मंजुर करण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे ओम इंटरप्रायजेस भोकरदन जि. जालना येथे संगणक दुरुस्ती व देखभालीचे काम करत असुन त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात संगणक दुरुस्ती, नविन ॲन्टी व्हायरस टाकणे, प्रिंटर दुरुस्ती या प्रमाणे ईतर संगणकांचे केलेल्या कामाचे 65,156/-रुपयाचे बिल मंजुर करण्यासाठी आ.लो.से. श्री.महेश चौधरी यांनी ४000/- रुपयाची लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 27/10/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. महेश चौधरी, यांनी तक्रारदार यांना 4000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून आजच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर तर्फे सापळा आयोजीत केला असता आ.लो.से. श्री. महेश चौधरी यांनी लाचेची मागणी करुन लाच रक्कम 4000/- रुपये पंचासमक्ष स्विकारली. लाच स्विकारल्यानंतर नमुद आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार दिगंबर पाठक, साईनाथ तोडकर, पोलीस अंमलदार विलास चव्हाण, चालक देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8668752530
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530

(राजीव तळेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर